# आनंद यादवांच्या कथेतून व्यक्त झालेले अनुभवविश्व

**वडितके जी.के.**
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सात्रळ, ता.राहुरी,जि.अहमदनगर

**सारांश:** आनंद यादवांच्या कथेतून शेतीमातीतील विविध अनुभव प्रकट होतात. शेतकरी आणि शेतमजूर हे त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी आहे. त्याच बरोबर आधुनिक यंत्र संस्कृतीमुळे ज्या बदलत्या जाणिवा आल्या आहेत, त्यामुळे ग्रामीण जीवन ढवळून निघाले आहे. याचेही चित्रण त्यांनी कथेतून केले आहे. यादवांनी शेतीमातीतील, शेतमळयात प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतलेला आहे. शेतमजूरांचे जगणे जवळून बघितले आहे. त्यांच्या व्यथा,वेदना, विद्रोह,दुःख,दारिद्रय, उपासमार हे विशय कथेतून मांडले आहे.

***प्रस्तावना :***

खकाळ या कथासंग्रहातून निवेदनासाठीही ग्रामीण बोलीचा वापर करुन ग्रामीण जीवनातील अनुभव अतिशय चैतन्यशील स्वरुपात मांडले. कागल, कोल्हापूरच्या ग्रामीण बोलीभाषेतून तरल काव्यातम अनुभूती व्यक्त होते. डवराणी या कथासंग्रहातील कथेमधून ग्रामीण जीवन अधिक विस्तृतपणे येते. उखडलेली झाडे या कथासंग्रहामधून ग्रामीण जीवनातील परिवर्तनाचा वेध घेतला आहे. आदिताल मधील कथांच्या मधून मानवी जीवनाच्या आदिम प्रकृतीचा शोध यादवांनी घेतला आहे. शेतीमातीतील अनुभव तसेच ग्रामीण जीवनातील माणसाच्या विविध प्रकृती कथेतून मांडल्या. त्यांच्या अनुभवाचे कथाक्षेत्र विस्तारत गेले आहे. त्यामधुन त्यांची कथा अधिक सकस बदली आहे.

***सधन शेतक—याचे चित्र :—***

आनंद यादवांच्या मोजक्याच कथांमधून सधन शेतक—याचे चित्रण व्यक्त झाले आहे. त्यांच्या कथेतून शेतक—यांकडून शेतमजूर आणि अल्पभूधारक शेतक—यांचे होणारे शोशण व्यक्त होते. सधन शेतक—याला अधिकच श्रीमंत होण्याचा हव्यास लागला आहे. आपल्या आहे त्या जमीनालाच जोडून अधिक जमीन घेत राहण्याची त्याची भूक वाढतच जाते. गावातील महत्वाच्या सत्ता केंद्रात तो आपले स्थान पक्के निर्माण करुन राहिला आहे. आजच्या बदलत्या ग्रामीण जीवनात हा बदल अधिक प्रकर्शाने जाणवतो. खेडयाचे स्वरुप जसे वेगाने बदलत आहे. त्यामुळे खेडयांचा चेहरा —मोहरा नव्या अंगाने एकदम बदलत आहे. त्याचे मात्र दुश्परिणामही खेडयांवर होत आहेत. संथ स्थितीशील असलेली खेडी वेगाने बदलत आहे. ज्याची परिस्थिती या नव्या बदलाला जाण्याची पोशक नाही. नव्या सरकारी योजना सर्व सामान्य शेतमजूर, शेतक—यांच्या आर्थिक उन्नयानासाठी आहेत. त्यामध्ये भ्रश्टाचार हा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामध्ये सर्व सामान्याला न्याय मिळत नाही.

'कोंडमारा' या कथेतील संतू हा शेतमळयाचा मालक असून तो त्याच्या शेतात काम करणा—या वाडकराची पारी लक्ष्मी, हौसी या तरुण स्त्रियांचे लैगिंक शोशण करतो. संतू हा शेतमजूरांच्या स्त्रियांचे लैगिंक शोशण करुन स्वतःची कामवासना भागविण्याचा प्रयत्न करतो. अंघोळीचा दिवस या कथेतील शेतक—याची जमीन पाच एकरांवरुन अठरा एकरापर्यंत जाते. दरवर्शाला जमीन घेण्याची त्याची भूक वाढतच जाते. लहान शेतकरी गरजेसाठी आपल्या जमीनीचे तुकडे विकत जातो. मोठा शेतकरी अधिक जमीन घेतच राहतो. यातून छोटया शेतक—यांचे शोशण होत राहते. शेतकरी म्हणुन असलेले त्याचे अस्तीत्व नष्ट होत जाते. फारथाचं पाणी या कथेतील गणू लाळकेची तिन्ही मुले शेतीत राबतात. चांगले उत्पन्न काढतात,त्याचा एक मुलगा सरपंच असतो. म्हणून त्याच्या शेतीला मुबलक पाणी मिळते, सर्व सामन्य कुटुंबातल्या फौजी म्हणुन निवृत्त झालेला लक्ष्मण मोरेला कॅनालचे पाणी मिळत नाही. छोटया शेतक—यांचे शोशण हे अनेक प्रकारे होत राहते.

आनंद यादवांच्या कथेत सधन शेतक—याकडून शेतमजूर आणि आर्थिक दृष्या निम्न स्तरातील शेतक—यांचे शोषण हे अनेक मार्गाने कसे होते याचे वास्तव चित्रण व्यक्त होते. सधन शेतक—याचा वर्ग हा स्वतःच्या सुखाच्या वेगळया कल्पना करुन कसा जगतो त्याचे स्वतःचे वेगळे ऋतू असतात. त्याला भौतिक सुविधा उपलब्ध होतात. जगण्याचे मूलभूत प्रश्न त्याचे सुटलेले असतात. त्याच्या पालीकडे जीवनातील सुख,सुविधा स्वतःचे अहंकार, राग, लोभ,प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करतो. अशा पध्दतीने आनंद यादवांनी आपल्या कथेत सधन शेतक—यांची जाणवणारी विविध रुपे मांडली आहेत.

***दबलेल्या कालवासनेचे विदारक चित्रण :—***

माणसाच्या ठराविक आयुष्याच्या टप्प्यावर काम हि प्रेरणा प्रबळ होते. त्यासाठीच स्त्री आणि पुरुश यांचा वैवाहिक संबंध जोडला जातो. त्याला सामाजिक मान्यता असते. ज्या तरुण शेतमजूरांचा त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे विवाह हा होतच नाही त्यांचे तारुण्य हे तसेच वाया जातो. त्यांच्या मनात काम वासनेची जाणीव सतत होत राहते. त्याचे चित्रण आनंद यादवांनी काही कथांमधून केली आहे.

''विश्वासघात'' या कथेतील सिद्द हे हा रोजगारी तरुण एकाकी जीवन जगतो. आई वडील मरण पावल्याने तो निराधार असतो. शेजारीच राहत असलेली सावित्रीशी लग्न व्हावे असते वाटते. तिचे लग्न दुस—याशी होते. त्यामुळ तो उदास होतो. अनवाणी या कथेतील सदू हा बिन लग्नाचा राहतो. त्याच्या मनातील कामभावना उफाळून येतात. सिद्दु,सदू यांच्या सारख्या शेतमंजूरांच्या दबलेल्या काम वासनांचे चित्रणही आनंद यादव यांनी कथेत केले आहे.

***दारिद्रयाचे चित्रण करणा—या कथा :—***

आनंद यादवांच्या कथेतील व्यक्ती हया शेतमजूर आणि छोटा शेतकरी असल्यामुळे त्यांच्या जीवनातील दुःख,दैन्य, दारिद्रय त्यांनी मांडले आहे. त्यांच्या जीवनातील ताणतणाव हे रोजच्या जगण्यासाठीचे आहे. भूक ही त्यांची महत्वाची गरज आहे. पावसावर अवलंबून असलेल्या अपू—या शेतीतून भरवाशाचे उत्पन्न निघत नाही. तसेच वर्षातील ठराविक हंगामातच रोजगार मिळतो. त्यावरच माणसाची गुजराण असते. त्यामुळे जीवनात सतत कष्ट,यातना दुःख हे भरलेले आहे.

''भाडेकरी दत्तू आक्कूमावशी' या कथेतून मुलगा जूगार खेळून त्यामुळे प्रपंचाच्या सा—या वस्तू विकून टाकतो. रोजगाराशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. बापू रोजगारी असल्यातरी त्याचं पोट त्यावर भागत नाही. त्यामुळे तो बिनधास्तपणे चो—या करतो. चोरी करुन आपण चोरी केलीच नाही असे भासवितो.

''ओझं'' या कथांमध्ये पांडवा, दत्तबा, येशा, जयशा या हातगाडीवर हमालीचे काम करणा—या मजूरांच्या व्यथा, वेदना आणि दारिद्रय मांडले आहे. वखार सुब—या या वखार मालकांचे दारिद्रय भयानक आहे. गावात कुणीतरी मेलं त्यांच्या वखारीतील लाकडं विकली गेली तरच त्याच्या कुटूंबाची गुजराण होते. 'मुद्या' कथेतील नरस आणि पाउ या रोजगाराच्या जीवनातील भीषण दारिद्रय मांडले आहे.

'वरातीचा शालू' या कथेतील विधवा अंजनाची रामा,गण्या, तानी ही मूल आहेत. आपल्या नव—याची ती लग्नातील आठवण म्हणून ती शालू जपून ठेवते. नवरा मेल्यानंतर शेतमजूराच्या बायकोची होणारी परवड या कथेतून धातमीड कथेत पेरणीच्या दिवसांत जास्त पाउस पडल्यामुळे पेरणीचे काम थांबते. तेथून दोन—तीन दिवस रोजगार बुडतो. त्यामुळे शेतमजूरांची चूल बंद पडते.

शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी यांच्या कमीत कमी कपडयाच्या गरजा आणि झोपण्यासाठी जागा एवढयाच मर्यादीत गरजा असतात. भूक ही त्यांची गरज मात्र भागत नाहीत्र अतिशय दारिद्रयात मोडकळीस आलेल्या घरात निवा—यात जगणारी माणसे थंडी,उन, वारा,पाउस,सतत अंगावर झेलीत निसर्गाशी सतत झुंज देत जगत असतात. पोटाला भाजी, भाकर मिळावी एवढीच माफक अपेक्षा घेउन जगणारी ही माणसे सतत रोजगाराच्या मागे लागलेली असतात. शेती कामासाठीचा रोजगारही सतत मिळत नाही. मिळणारा रोजगारही अतिशय अल्प असतो.

***स्त्रीचे अनुभवविष्व :–***

आंनद यादव यांनी ग्रामीण जीवनातील स्त्रीला कोणकोणत्या गोश्टीला सामोरे जावे लागते याचे चित्रण केले आहे. नव्याने लग्न झालेल्या स्त्रीच्या आसुखासाचे चित्रण केले आहे. सकाळी उठल्यापासून ते संध्याकाळ पर्यंत कश्ट करावे लागते. पुन्हा घरांमध्ये तिला सन्मानाची वागणूक मिळत नाही. शेतमजूरांच्या घरातील स्त्रीला तर अनेक खडतर प्रसंगाना तोंड द्यावे लागते. नवरा आणि बायको दोघांनी रोजगार केल्याशिवाय पोटालाच खायला मिळत नाही. शेतीची कामे सुध्दा ठराविक वेळेलाच असतात. त्यामुळे त्या वेळी मिळेल तो कामधंदा करुन पोटपाण्याची व्यवस्था करावी लागते. स्त्रीला ग्रामीण जीवनात परिस्थितीशी झगडत खडतरपणे जीवनाला सामोरे जावे लागते. तिला सोसाव्या लागणा–या व्यवथा, वेदना आणि दुःखाचे चित्रण यादवांनी कथेत केले आहे.

अज्ञान अंधश्रध्देमुळे कुटूंबात मुलांची संख्या किती असावी याचे भान न राहिल्याने दारिद्रय आणि दुःख,रोजगारी, माणसांच्या जीवनात वाढतच आहे. अवतिभोवतीच्या परिस्थितीतही तिला कशी प्रतिकूल आहे. ती दैन्य,दुःख,दारिद्रय आणि वेदना यांच्या विळख्यात कशी अडकली आहे. याचे आनंद यादवांनी कथेत चित्रण केले आहे.

***विधवा स्त्रियांच्या समस्या :–***

आनंद यादवांनी विधवा स्त्रियांच्या एकाकी पणाचे दुःख मांडले आहे. त्यामध्ये या रोजगार करुन जगणा–या स्त्रियांचे दुःख पुन्हा अधिकच असते. रोजगार करण्याच्या ठिकाणी तरुण पुरुश हा तरुण विधवा स्त्रियांशी अधिक लगट करण्याचा प्रयत्न करतो. त्यात सहानुभूती नसून त्यात वासनेचा अंश भरलेला आहे. तो विधवा स्त्रीला चटकन जाणवतो. मात्र तो तिला भुकेपणाने सहन करावा लागतो. त्यांच्याशी मिळून– मिसळून राहिले तरच तिला रोजगार मिळतो. मुंडरी या कथेत अशाच स्त्रीचे दुःख मांडले आहे. सुटकेतील पाश या कथेतील मोहितेबाईचा नवरा हा भारत–चिन लढाईमध्ये वारला. त्यामुळे तिचा संसार अर्ध्यावर संपला. नव–याबरोबर संसार करतांना तिला मूल झाले नाही. त्याचंही संसारसूख तिला मिळत नाही.

ग्रामीण जीवनातील विधवा स्त्रिकडे असलेले अपुरे शिक्षण रोजगाराची अपुरी संधी, अज्ञान,अंधश्रध्दा, पुरुषी संस्कृतीचे वर्चस्व, आर्थिक दुर्बलता या अशा अनेक समस्यांना विधवा स्त्रियांना सामोरे जावे लागते.

***वृध्द शेतमजूर :–***

आनंद यादव यांनी वृध्द शेतमजूराचे किती कष्टदायक जीवन यांचे चित्रण आपल्या कथेत केले आहे. शेतमजूरांची वृध्दपकाळातील अवस्था अतिशय वाईट असते.

आपले अस्तित्व टिकविण्यासाठी सतत धडपडणारी निकराची झुंज देणारी ही माणसे सकारात्मक दृष्टीने जीवन जगतात. आपल्या मर्यादीत विश्वास जगण्याचा मार्ग शोधीत राहातात. निसर्गाशी एकरुप होतात. स्वतंत्र आले,शिक्षणाची दारे सर्व सामान्य माणसांसाठी खुली झाली. आज राजकारण आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे आर्थिकदृष्टया कमकुवत वर्ग बाजूला पडला. नवनवीन बंधारे, कालवे तयार झाली. शेती ओलिताखाली आली. मात्र अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आहे त्यांच्या जीवनात मात्र फरक नाही. आर्थिक दृष्टया मध्यमवर्गीय माणसांचे दुःख, वेदना आणि दारिद्रय यांचे चित्रण आनंद यादव यांनी कथेत केले आहे.

***संदर्भ सूची :–***

1.पवार गो.मा. : 'आंनद यादवांचे कथालेखन' प्रतिष्ठान, मे 1968
2.पाटील तान्हाजी रा. : ''आनंद यादव –साहित्य आणि विचार'' यशोदीप पब्लिकेशन, पुणे –2013.